वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना आ. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांची क्रियाशील आदरांजली

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन करताना प्रत्येक गुरुदेव भक्ताचे मन कृतज्ञतेने भरून येते. राष्ट्रसंतांनी आपल्या अध्यात्म, समाजप्रबोधन, ग्रामविकास आणि राष्ट्रनिर्माणाच्या विचारांनी संपूर्ण देशाला दिशा दिली. “ग्रामगीता” या अमर ग्रंथातून त्यांनी ग्रामस्वराज्य, सामाजिक समता, स्वावलंबन आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांचे तेज आजही समाजमन उजळवत आहे.

राष्ट्रसंतांना खरी आदरांजली ही केवळ शब्दांतून नव्हे, तर त्यांच्या विचारांना कृतीत उतरवूनच वाहिली जाऊ शकते. हीच भावना मनाशी बाळगून भाजपाचे ज्येष्ठ नेते आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी वंदनीय राष्ट्रसंतांच्या कार्याला अभिवादन करणारे अनेक ऐतिहासिक आणि परिणामकारक प्रयत्न यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत.

नागपूर विद्यापीठाला वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे नाव मिळावे, ही गुरुदेव भक्तांची अनेक वर्षांची भावना होती. या मागणीला न्याय मिळवून देण्यासाठी आमदार सुधीरभाऊंनी संसदीय पातळीवर सातत्यपूर्ण, अभ्यासपूर्ण आणि प्रभावी संघर्ष उभारला. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आज नागपूर विद्यापीठ राष्ट्रसंतांच्या नावाने ओळखले जाते, ही प्रत्येक गुरुदेव भक्तासाठी अभिमानाची बाब आहे. हा केवळ नामांतराचा विजय नव्हता, तर राष्ट्रसंतांच्या विचारांना शैक्षणिक विश्वाच्या केंद्रस्थानी स्थान देणारा ऐतिहासिक क्षण होता.

याचबरोबर, राष्ट्रसंतांच्या कर्मभूमी असलेल्या श्री गुरुकुंज आश्रम, मोझरी याला ‘अ वर्ग तीर्थक्षेत्र’ दर्जा मिळवून देण्यासाठीही त्यांनी यशस्वी पाठपुरावा केला. त्यामुळे या पवित्र स्थळाच्या विकासाला नवी गती मिळाली आणि राष्ट्रसंतांच्या कार्याचा गौरव अधिक व्यापक झाला. ज्यावेळी राष्ट्रीय महामार्ग निर्माण कार्य सुरु झाले तेव्हा गुरुकुंज आश्रम समाधी स्थळाचा काही भाग त्यात जाणार होता, ही बाब आश्रम संचालक, गुरुदेव भक्तांनी निदर्शनास आणून दिली असता सुधीरभाऊंनी पुढाकार घेऊन ही कार्यवाही थांबविली आणि समाधी स्थळ सुरक्षित केले

नागपूर विद्यापीठात ‘राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन’ स्थापन करून त्यांच्या विचारांचे शैक्षणिक संशोधन, अभ्यास आणि प्रसारासाठी भक्कम व्यासपीठ निर्माण करण्यात आले. हा उपक्रम राष्ट्रसंतांच्या विचारधनाला भावी पिढ्यांपर्यंत पोहोचविणारा दीपस्तंभ ठरत आहे.

आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचे राष्ट्रसंतांविषयीचे नाते केवळ सार्वजनिक कार्यापुरते मर्यादित नाही. ते अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे आजीवन ट्रस्टी तसेच उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. त्यामुळे राष्ट्रसंतांच्या विचारांच्या संवर्धनासाठी त्यांचे योगदान अधिक सखोल आणि आत्मीयतेचे आहे.

नागपूर विद्यापीठाला राष्ट्रसंतांचे नाव देण्याचा ऐतिहासिक निर्णय झाल्यानंतर गुरुकुंज मोझरी येथे गुरुदेव भक्तांनी आमदार सुधीरभाऊंना विशेष निमंत्रित केले. त्यावेळी त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे, ज्या पवित्र गादीवर स्वतः राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विराजमान होत असत, त्या गादीवर त्यांना बसवून "ग्रामगीता" प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. हा क्षण स्वतः सुधीरभाऊंनी आपल्या आयुष्यातील अत्यंत भाग्याचा आणि अविस्मरणीय क्षण असल्याचे नमूद केले आहे. गुरुदेव भक्तांसाठीही तो अभिमानाचा आणि भावस्पर्शी सोहळा होता.

याहूनही पुढे जाऊन वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' मरणोत्तर प्रदान करण्यात यावा, या मागणीचा त्यांनी सातत्याने आणि नेटाने पाठपुरावा केला आहे. राष्ट्रसंतांच्या विराट कार्याला राष्ट्रीय पातळीवर योग्य तो गौरव मिळवून देण्यासाठी त्यांची ही धडपड निश्चितच प्रेरणादायी आहे.

आज राष्ट्रसंतांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी त्यांच्या विचारांचे स्मरण करून ग्रामविकास, समाजसेवा, नैतिकता आणि राष्ट्रभक्तीची शिकवण आपल्या जीवनात उतरविण्याचा संकल्प करायला हवा. तसेच राष्ट्रसंतांच्या विचारांना कृतीतून जपणाऱ्या आणि त्यांच्या कार्याला नवे आयाम देणाऱ्या सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, हीच वंदनीय राष्ट्रसंतांना खरी क्रियाशील आदरांजली ठरेल.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना कोटी कोटी प्रणाम!

जय गुरुदेव! 🙏